


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026 बुधवार दि. ०८ जूलै २०२६




आवृती- पुणे,अहील्यानगर,मुबंई,ठाणे,पालघर,सिंधुदुर्ग,रत्नागिरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ५ | वर्ष : ४ थे | अंक : २०८ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

# घुलेवाडीत शिवम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या अत्याधुनिक नव्या वास्तूचे लोकार्पण उत्साहात!

शिवम हॉस्पिटल सेवा देताना ना नफा ना तोटा या तत्त्वावर देशात आपली ओळख निर्माण करेल .... **माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात**

आरोटे हॉस्पिटल ही ओळख आता शिवम हॉस्पिटल मधून होत असली तरी आरोटे परिवाराला कोणताही अहंकार अविर्भाव भविष्यात होणार नाही.. **डॉ अतुल आरोटे**

पुणे मुंबई नाशिक संभाजीनगर याच धरतीवर शिवम हॉस्पिटल सेवा देण्यात आघाडीवर राहील..**इंजी राम नाथ आरोटे**

आजी आजोबांच्या हस्ते शिवम हॉस्पिटल उद्घाटन... नो मंत्री नो आमदार नो सिने अभिनेता ओन्ली वारकरी संप्रदाय याला दिले आरोटे परिवाराने प्राधान्य

मुळातच डॉक्टर अतुल आरोटे हे आरोग्य सेवेत येण्याअगोदर सचिन तेंडुलकर यांचे फ्रॅन उद्याच्या इंडिया टीम मध्ये अतुल आरोटे यांचा समावेश होईल अशी होती अपेक्षा मित्र परिवाराची मात्र..... पण खेळाबरोबर शिक्षणाला महत्त्व त्यांनी शालेय जीवनात क्रिकेटचा फ्रॅन मास्टर अशी त्याची ओळख पण तो बनला डॉक्टर.... सचिन तेंडुलकर याची पत्नी डॉक्टर मात्र पत्नी डॉक्टर मिळाली दोघेही डॉक्टर झाले ... आमचा अतुल आता झाला झाला आरोग्य सेवेतील क्रिकेटर

हॉस्पिटल सुरू झाल्यापासून चितळवेढे गावातील कोणत्याही नागरिकाकडून तीन आकारता मोफत सेवा देण्याचा आजही त्यांचा संकल्प सुरूच......









**ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार व सर्वसमावेशक आरोग्यसेवेचा नवा पर्याय! मुंबई पुणे नाशिक शहरांपेक्षा कमी पैशात जास्त सेवा देण्याचा माझा संकल्प. डॉक्टर अतुल आरोटे**

डॉ. विश्वासराव आरोटे, कळसुबाई शिखरावरून. अहिल्या नगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यात म ोठ्या प्रमाणात आरोग्यसेवा यावर अनेक जिल्ह्यातील लोक विश्वासाने येत असतात हा विश्वास संपादन करत असताना पैसा नको मात्र आलेल्या पेशंटला सुविधा दिल्यानंतर तो जाताना त्याच्या परिवाराला व त्याच्या चेहऱ्यावर जो आनंद होतो तोच खरा आमचा नफा आहे हीच संकल्पना अनेक वर्ष मनी धरत डॉक्टर आरोटे परिवाराने राबवली आज शिवम हॉस्पिटल मुंबई पुणे नाशिक संभाजीनगर या शहरातील हॉस्पिटल पेक्षा या हॉस्पिटलमध्ये सेवा व या भागातील असलेली मनोरंजक व स्वच्छ निर्मळ यामुळे येथे येणारा पेशंट हा प्रथम निसर्ग सौंदर्याने व स्वच्छतेने नक्कीच बरा होऊन जाईल जास्तीत जास्त सेवा देणे हीच संकल्पना मनी धरून शिवम हॉस्पिटल हे देशाच्या पटलावर नक्कीच आपले नाव वेगळ्या रेषेत आरोग्य सेवेत ठसा उमटवेल असा विश्वास देखील राज्याचे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केला विशेष म्हणजे उद्घाटन सोहळा हा आपल्या परिवारातील हरिभक्त परायण दशरथ नाना आरोटे आजी देव बाई दशरथ आरोटे यांच्या शुभहस्ते संपन्न होत असताना या परिवाराने पिढ्यानपिढ्या पैशापेक्षा माणसं कमवली वडिलांनी दिलेला आदर्श आजी-आजोबांचे स्वप्न चुलते यांचा असलेला पाठिंबा यामुळे शिवम हॉस्पिटल नक्कीच कुणाबरोबर स्पर्धा नाही कुणाची निंदा नाही मात्र



येणाऱ्या प्रत्येकाला सेवा देण्यात नक्कीच आम्ही अधिकच करू हाच या समूहाचा संकल्प असल्याचे देखील थोरात यांनी व्यक्त केले,......

संगमनेर तालुक्यातील घुलेवाडी येथे उभारण्यात आलेल्या शिवम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या अत्याधुनिक नव्या वास्तूचे लोकार्पण रविवारी (दि. ५ जुलै) मोठ्या उत्साहात व दिमाखदार वातावरणात पार पडले. डॉ. अतुल आरोटे यांच्या आजी-आजोबांच्या शुभहस्ते झालेल्या या लोकार्पण सोहळ्यास राजकीय, सामाजिक, वैद्यकीय व धार्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. ग्रामीण भागातील नागरिकांना आधुनिक, दर्जेदार आणि परवडणारी आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण टप्पा असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

या लोकार्पण सोहळ्यास महाराष्ट्राचे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, आमदार अमोल खताळ पाटील, आमदार डॉ. किरण लहामटे, विधान परिषदेचे आमदार सत्यजित दादा तांबे, ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, नामवंत डॉक्टर, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी हॉस्पिटलम धील अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा, आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित उपचारपद्धती आणि रुग्णकेंद्रित सेवा यांचे विशेष कौतुक केले. ग्रामीण भागातील रुग्णांना उपचारासाठी पुणे, नाशिक किंवा अहमदनगर येथे जाण्याची गरज कमी होणार असून, अनेक तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली एकाच छताखाली विविध आजारांवर उपचार उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे संगम नेरसह परिसरातील हजारो नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचेही मत व्यक्त करण्यात आले.

शिवम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये जनरल मेडिसिन, जनरल सर्जरी, ऑर्थोपेडिक्स, कार्डिओलॉजी, गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी, नेफ्रोलॉजी, न्युरोलॉजी, अत्याधुनिक पॅथॉलॉजी लॅब, डिजिटल एक्स-रे, सोनोग्राफी, एंडोस्कोपी, २४ तास आपत्कालीन सेवा, सुसज्ज ऑपरेशन थिएटर, प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचारी तसेच अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांनी सुसज्ज उपचार व्यवस्था उपलब्ध करण्यात आली आहे. रुग्णांना जलद, अचूक आणि गुणवत्तापूर्ण उपचार देण्यावर विशेष भर देण्यात आला असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

हॉस्पिटलचे संचालक डॉ. अतुल आरोटे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ग्राम ीण भागातील प्रत्येक नागरिकाला शहरांप्रमाणे आधुनिक आरोग्यसेवा आपल्या परिसरातच मिळावी, या उद्देशाने शिवम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलची उभारणी करण्यात आली आहे. रुग्णसेवालाच सर्वो च्च प्राधान्य देत अनुभवी डॉक्टर, अत्याधुनिक यंत्रसामग्री आणि पारदर्शक वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी हॉस्पिटल सदैव कटिबद्ध राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी उपस्थित मान्यवर, वैद्यकीय क्षेत्रातील सहकारी, कर्मचारी, हितचिंतक आणि नागरिकांचे डॉ. अतुल आरोटे यांनी मनःपूर्वक आभार मानले. लोकार्पणानंतर उपस्थितांनी हॉस्पिटलची पाहणी करून विविध विभागांतील सुविधा जाणून घेतल्या. ग्रामीण भागातील आरोग्यसेवेला नवी दिशा देणारा हा प्रकल्प ठरेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला..........

## होलिस्टिक प्रोग्रेस कार्ड (Holistic Progress Card) समोरील आव्हाने आणि प्रशासनाची सज्जता

विद्यार्थ्याचे मूल्यमापन केवळ गुणांवर नव्हे, तर त्याच्या सर्वांगीण विकासावर झाले पाहिजे. या विचारातून होलिस्टिक प्रोग्रेस कार्ड (क्झ्रउ) ही संकल्पना उदयास आली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (छएझ २०२०) मध्ये विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, शारीरिक, सामाजिक, भावनिक, नैतिक आणि सर्जनशील विकासाचे सर्वंकष मूल्यमापन करण्यावर भर देण्यात आला आहे. त्यामुळे पारंपरिक गुणपत्रिकेऐवजी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीचे चित्र दर्शविणारे होलिस्टिक प्रोग्रेस कार्ड महत्त्वाचे ठरत आहे.

होलिस्टिक प्रोग्रेस कार्डची प्रभावी अंमलबजावणी करताना अनेक आव्हाने समोर येतात. अनेक शिक्षकांना या नवीन म ूल्यमापन पद्धतीचे पुरेसे प्रशिक्षण नसते. प्रत्येक विद्यार्थ्याच्या विविध कौशल्यांचे सातत्याने निरीक्षण करून अचूक नोंदी ठेवणे वेळखाऊ आणि जबाबदारीचे काम आहे. मोठ्या वर्गसंख्येमुळे प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देणे कठीण जाते. तसेच काही पालक अजूनही केवळ गुण आणि क्रमांक यांनाच म हत्त्व देतात. त्यामुळे होलिस्टिक मूल्यमापनाची संकल्पना समाजात अधिक प्रभावीपणे पोहोचविण्याची गरज आहे. या आव्हानांवर मात करण्यासाठी प्रशासनाने योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. शिक्षकांना नियमित प्रशिक्षण देणे, डिजिटल प्रोग्रेस कार्ड प्रणाली विकसित करणे, शाळांना आवश्यक तांत्रिक सुविधा उपलब्ध करून देणे आणि पालकांसाठी जनजागृती कार्यक्रम आयोजित करणे गरजेचे आहे. शाळा व्यवस्थापन, शिक्षक, पालक आणि शिक्षण विभाग यांच्यात समन्वय निर्माण झाल्यास या प्रणालीची अंमलबजावणी अधिक प्रभावी होईल.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि छ्उऋ २०२३ मध्ये विद्यार्थ्यांच्या क्षमता, कौशल्ये, मूल्ये, सर्जनशीलता, संवादकौशल्य, सहकार्याची वृत्ती आणि चिकित्सक विचार यांचे मूल्यमापन करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. होलिस्टिक प्रोग्रेस कार्ड हे याच उद्दिष्टांना पूरक साधन आहे. यामुळे विद्यार्थी स्वतःच्या प्रगतीचे आत्मपरीक्षण करू शकतात, तर शिक्षक आणि पालकांना विद्यार्थ्यांच्या विकासाची स्पष्ट दिशा मिळते.

शेवटी, होलिस्टिक प्रोग्रेस कार्ड ही केवळ गुणपत्रिका नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा आरसा आहे. प्रशासनाची सज्जता, प्रशिक्षित शिक्षक, पालकांचा सहभाग आणि प्रभावी अंम लबजावणी यांच्या साहाय्याने ही संकल्पना शिक्षण अधिक



**विजय दुंदा कातडे**
**(प्राथमिक शिक्षक)**
**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रणद खुर्द**
**मोबाईल-९०४९६९२२२०**
**शिक्षण- एम ए एम एड**

गुणवत्तापूर्ण, विद्यार्थीकेंद्रित आणि भविष्याभिमुख बनवू शकते. गुणांपेक्षा गुणांचा विकास महत्त्वाचा; हाच होलिस्टिक प्रोग्रेस कार्डचा खरा संदेश आहे.



# वीरगावची इरसाल पाटीलकी अनंताच्या प्रवासाला...

## स्व. रंगनाथ (दादा) पाटील वाकचौरे यांना भावपूर्ण श्रद्धांजली










**अकोले... बेरकी,हिकमती,हुशार,हजरजबाबी,ग्राम्य विनोदाची जाण अशा शब्दशः अर्थाची आमच्या वीरगावची इरसाल पाटीलकी अनंताच्या वाटेवर गेली.सध्या ४० ते ५० या वयाच्या पिढीने अनुभवलेली ही पाटीलकी यापुढच्या कोणत्याही पिढीच्या वाट्याला येणार नाही.स्व.रंगनाथ पाटील वाकचौरे यांना अधिकृत पाटीलकी नसली तरी देहबोली मात्र अस्सल पाटीलकीची होती.'दादा' हे टोपणनाव असले तरी 'पाटील' म्हणूनच ते सर्वपरिचित होते.स्व.खासदार बाळासाहेब विखे पाटील यांच्या 'देह वेचावा कारणी' मध्येदेखील स्व.रंगनाथ पाटील वाकचौरे यांचा उल्लेख असावा इतके ते सर्वपरिचित होते.**





स्व.विखे पाटील,स्व.भाऊसाहेब थोरात,स्व.मधुकरराव पिचड यांचेशी अखेरपर्यंत राजकीय संधान बांधणा-या पाटलांचा तसा राजकीय वारसा शुन्य.पितछत्राची सावली हरविल्यानंतर मातृछायेखाली केवळ जगण्याचा आटापिटा करणारा हा माणूस राजकीय पटलावर इतका उंचीवर जातो हे विशेष.राजकारणात पाटलांनी अनेक पदे भोगली.कॉ.दत्ता देशमुख हे तसे पाटलांचे राजकारणातील पहिले आदर्श.शेतकरी-कामगारांच्या कम्युनिस्ट चळवळीनंतर त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची वाट धरली.माजी मंत्री मधुकरराव पिचड यांचे प्रत्येक विधानसभा निवडणूकीत तालुक्याचे व्यासपीठ गाजविणा-या स्व.पाटलांच्या भाषणाची त्यावेळी श्रोत्यांना मेजवानीच असायची.अनेक वक्ते आले आणि गेले परंतु आजही पाटलांची नर्मविनोदी भाषणे लोकांच्या स्मरणात आहेत आणि ती चिरकाल राहतील. 'गरीबी घालवायची असली तर श्रीमंतीचा डोस द्यावा लागतो' हा संदेश देणा-या पाटलांना तुमच्या खिशात दमडी नसू द्या मात्र नीटनेटक रहा हे अभिप्रेत असायचं.देव,पुजा-अर्चा ही सारी धार्मिक बंधने पाळणारा हा माणूस अंतरंगात मात्र पक्का पुरोगामी होता.'अरे ग्रंथ काय वाचता माणसं वाचा...त्यांची अडचण समजून घ्या..त्यांना मदत करा..देव तुम्हाला माणसात भेटेल.' इतक पक्क लॉजिक पाटील अखेरपर्यंत जपले.

राजकारणात असूनही पाटलांना हितशत्रू मात्र अनेक. राजकारणाच्या प्रवासात अनेकजण आडवे आले तरी सर्वांना हा म ाणूस पुरुन उरला.अगस्ती कारखान्याचे संस्थापक संचालक,खरेदी विक्री संघाचे चेअरमन,बाजारसमितीचे सभापती या पदांशिवाय पाटलांनी आपलं आस्तित्व मात्र वेगळं ठेवलं.कुठलही पद असेल तर समाजात प्रतिष्ठा असते हा सिध्दांत पाटलांनी खोटा ठरविला होता. अल्पशिक्षित असले तरी शेती,सहकार,पाणी आणि ग्रामीण जीवनाचा त्यांचा अभ्यास चांगला होता.आमच्या देवठाणच्या आढळा धरणाचा त्यांचा असलेला अभ्यास मात्र चकित करणारा होता.शेतीची तर बारीक सारीक माहिति पाटलांना होती.सुबत्ता आल्यानंतर या माणसाच वर्तन मात्र आजिबात बदललं नाही.मोठमोठ्या राजकीय लोकांशी संबंध असले तरी तळातल्या गोरगरीब माणसाशी गप्पा मारणे हा पाटलांचा आवडता छंद होता.समाजाचे खरे प्रश्न याच माणसांच्या बोलण्यातून ध्यानात येतात हे त्यांना पक्क ठाऊक होतं. त्यांची विनोदी वकृत्व शैलीचा बहार वाढण्याचे हे प्रमुख कारण होते. तशी पाटलांनी इंग्लंड वारी पण केली.गावाकडचा माणूस विमानात बसून जेव्हा परदेशवारी करतो तेव्हा येणा-या अडचणींचे रसभरीत आणि विनोदी वर्णन पाटील करायचे.अनेक महाविद्यालयात 'इंग्लंड वारी' सांगताना पाटलांनी विद्यार्थ्यांना खळखळून हसविले.

पाटील जाऊन आता दहा दिवस झाले.महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे माजी अधिकारी विलास वाकचौरे,दारु उत्पादन शुल्क खात्याचे अधिकारी संजय वाकचौरे,खरेदी विक्री संघाचे माजी उपाध्यक्ष बाबासाहेब वाकचौरे ही त्यांची मुले त्याचप्रमाणे सुना,नातु,मुली या सर्वांच्या आठवणीतून ते जाणार नाहीतच परंतु आमच्या वीरगावसहित अकोले तालुक्याच्या स्मरणात पाटील अनंतकाळ राहतील.स्व.विखे पाटील,स्व.भाऊसाहेब थोरात,स्व.म धुकरराव पिचड यांची भेट जर कधी पाटलांची स्वर्गात झाली असेल तर तिथेही पाटलांच्या विनोदाची मैफिल रंगलेलीच असेल ही पक्की खात्री आहे.

**आमच्या सर्व वीरगावकरांच्या वतीने स्व.रंगनाथ पाटील यांना भावपूर्ण आदरांजली.**

# परिवार सेतू व प्रश्नमंजुषा स्पर्धेचा उत्साहात शुभारंभ; ९४ आदर्श कुटुंबांचा गौरव, विद्यार्थ्यांना लाखाहून अधिक रुपयांची बक्षिसे!

मुंबई (समर्थ गांवकरी)




**श्री कच्छ वागड लोहाणा महाजन, मुंबई, श्री कच्छ वागड लोहाणा महिला मंडळ, मुंबई, श्री वागड रघुवंशी मित्र मंडळ, मुंबई आणि श्री अखिल गुजरात कच्छ वागड महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित परिवार सेतू व प्रश्नमंजुषा स्पर्धेचा उत्साहात शुभारंभ ज्येष्ठ समाजसेवक श्री नानजीभाई खीमजीभाई ठक्कर (ठाणेवाले) यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन व गणेश वंदनेने करण्यात आला. समाजातील कौटुंबिक ऐक्य, संस्कार, शिक्षण आणि सामाजिक बांधिलकी यांना प्रोत्साहन देणाऱ्या या कार्यक्रम ला समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री नानजीभाई खीमजीभाई ठक्कर (ठाणेवाले) होते. यावेळी उपाध्यक्ष श्री धर्मेंद्रभाई वालजीभाई कारिया, श्री नटवरलाल विरजीभाई ठक्कर, श्री दिनेशभाई राजदे, श्री प्रवीणभाई चंदे, श्री प्रवीणभाई सायता, श्री हितेशभाई रैया, श्री विनोदभाई उदेचा, श्री किरणभाई पुजारा, श्री हर्षदभाई राछछ, श्री महेशभाई राजदे, श्री भाविनभाई आचार्य यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महिला मंडळाच्या वतीने महामंत्री श्रीमती हेतलबेन हितेशभाई सोमेश्वर, विभागीय उपाध्यक्षा श्रीमती हिनाबेन शंकरभाई उदेचा, विभागीय मंत्री श्रीमती नीताबेन मुकेशभाई कोटक, श्रीमती ज्योतीबेन कांतीभाई ठक्कर, श्रीमती काजलबेन शैलेशभाई ठक्कर, श्रीमती बीनाबेन निखिलभाई ठक्कर, विभागीय सहमंत्री श्रीमती प्रतिभाबेन पियूषभाई ठक्कर, सांस्कृतिक मंत्री श्रीमती गौरीबेन संजयभाई कोटक, सांस्कृतिक सहमंत्री श्रीमती प्रफुल्लाबेन विजयभाई मजीठिया, सल्लागार सहमंत्री श्रीमती उर्वीबेन ठक्कर, क्रीडा मंत्री श्रीमती चेतनाबेन ठक्कर तसेच विभागीय शिक्षण मंत्री श्रीमती स्मिताबेन ठक्कर यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी श्री कच्छ वागड लोहाणा महिला मंडळाच्या वतीने समाजसेवक श्री नानजीभाई ठक्कर यांचा भगवान श्रीराम, माता सीता, श्री लक्ष्मण व श्री हनुमान यांच्या सुंदर मूर्तीची भेट देऊन भावपूर्ण सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविकात बाबूलाल पुजारा यांनी श्री नानजीभाई ठक्कर यांच्या समाजकार्यातील योगदानाचा गौरव करताना सांगितले की, सुमारे ५० वर्षांपूर्वी कच्छ आणि गुजरातमध्ये समाजवाड्यांची कमतरता असताना त्यांनी अनेक समाजवाड्यांच्या उभारणीसाठी उदारहस्ते मदत केली. कच्छमधील विविध शाळा, जेसल-तोरल समाधी, अजयपाल दादा मंदिर, मुख्य प्रवेशद्वार तसेच आदिपूर, डीसा, बनासकांठा, अंजार, सामखियाळी, भचाऊ आदी ठिकाणच्या विकासकामांसाठी त्यांनी मोठे आर्थिक योगदान दिले. आजचा कार्यक्रमही त्यांच्या नावाने उभारलेल्या सभागृहात होत असल्याचा अभिमान त्यांनी व्यक्त केला.

सत्काराला उत्तर देताना श्री नानजीभाई ठक्कर म्हणाले, हा माझा १०,०१२ वा सत्कार आहे. हा क्षण माझ्यासाठी अत्यंत आनंदाचा आणि अभिमानाचा आहे. या सन्मानामागे माझ्या आई-वडिलांचे, ज्येष्ठांचे आशीर्वाद आणि ईश्वराची कृपा आहे. प्रत्येकाने समाजासाठी निःस्वार्थपणे कार्य केले तर अशा सन्मानाचे क्षण प्रत्येकाच्या आयुष्यात येऊ शकतात.

या कार्यक्रमात एकाच कुटुंबात सासू-सासरे आणि सून प्रेम, सुसंवाद व संस्कारपूर्वक एकत्र राहत असलेल्या ९४ आदर्श कुटुंबांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच गुजरातहून उपस्थित राहिलेल्या श्री दिनेशभाई यांचाही शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

प्रश्नमंजुषा स्पर्धेत सुमारे १०० विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत आपल्या ज्ञानाचे आणि बुद्धिमत्तेचे प्रदर्शन केले. विजेत्यांसह सर्व स्पर्धकांना प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना एक लाख रुपयांहून अधिक रकमेची रोख बक्षिसे प्रदान करण्यात आली.

समारोपाच्या भाषणात श्री नानजीभाई ठक्कर यांनी शिक्षण, संस्कार आणि व्यसनमुक्त समाजाची गरज अधोरेखित केली. प्रत्येक घर हे मंदिरासारखे असावे. घरात कोणत्याही प्रकारचे व्यसन नसावे. शिक्षणाशिवाय समाजाचा विकास शक्य नाही. शिक्षणासाठी केलेला खर्च कधीच वाया जात नाही, कारण पैशाने शिक्षणाचे खरे मूल्य विकत घेता येत नाही, असे ते म्हणाले. समाजात उभारण्यात आलेल्या आदर्श सुविधा आणि व्यवस्थेचेही त्यांनी कौतुक केले.

कार्यक्रमाच्या शेवटी श्रीमती हेतलबेन यांनी उपस्थित मान्यवरांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. अहमदाबाद येथील लोहाणा कन्या छात्रालयासाठी अनेक दात्यांनी आर्थिक सहकार्य करण्याची तयारी दर्शविली. समाजहितासाठी पुढे येणाऱ्या दात्यांच्या सेवाभावाचे उपस्थितांनी कौतुक केले.

महिला, पुरुष आणि बालकांच्या मोठ्या उपस्थितीत पार पडलेल्या या कार्यक्रमानंतर सर्वांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. सभागृहाचे दोन्ही हॉल उपस्थितांनी खचाखच भरल्याने कार्यक्रमाला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद स्पष्टपणे दिसून आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व दाते, पदाधिकारी, कार्यकर्ते व स्वयंसेवकांनी मोलाचे योगदान दिले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# अकोलेत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा उत्साहात; राज्यस्तरीय जिवन गौरव शैक्षणिक पुरस्कारांचेही वितरण!




अकोले (समर्थ गांवकरी)

**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा गुरुवार, दि. २ जुलै २०२६ रोजी इंदोरी फाटा येथील मातोश्री लॉन्स येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. दहावी, बारावी तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तसेच शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षणसेवकांना राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आले.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे होते. प्रमुख पाहुणे म्हणून थोर समाजसेवक व एन. के. टी. ट्रस्टचे अध्यक्ष शेठ नानजीभाई खेमजीभाई ठक्कर, कुणाल सोनवणे (उपविभागीय पोलीस अधिकारी, संगमनेर), शिवसेनेचे ज्येष्ठ नेते प्रभाकर फापाळे, राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या नेत्या पुष्पाताई लहामटे, महिला आघाडी प्रमुख निताताई आवारी, समाजसेवक राजेंद्र पांडे, प्रदेश प्रसिद्ध प्रमुख नवनाथ जाधव, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे कोल्हापूर जिल्हा अध्यक्ष बाजीराव फराटे, उत्तर महाराष्ट्र विभागीय सचिव अनिल रहाणे, प्रवरा माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सविता मेहेत्रे, सामाजिक कार्यकर्ते बिरबल वाकचौरे, सौ. परीघा विश्वासराव आरोटे, सुनील धुमाळ, अनिल रहाणे, पत्रकार संघाचे अकोले तालुका अध्यक्ष अशोक उगले, इलेक्ट्रॉनिक मीडिया अध्यक्ष सचिन खरात, कार्याध्यक्ष दत्ता जाधव, सचिव हरिभाऊ फापाळे, अकोले शहराध्यक्ष सुनील शेणकर, हल्ला विरोधी समितीचे अध्यक्ष शंकर संगारे, सहसचिव सचिन लगड, हरिभाऊ आवारी, जगन्नाथ आहेर, ललित मुतडक, गणेश रेवगडे, तालुका संपर्क प्रमुख संजय गायकर, सुनील आरोटे, संजय फुलसुंदर, अक्षय आभाळे, राजेंद्र राठोड, सुरेश देशमुख, दत्ता हासे, प्रवीण धुमाळ, राजेंद्र मालुंजकर, शांताराम सोनवणे, गणेश आवरी, सुरेश देशमुख, विजय शेळके यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, पत्रकार, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात तालुक्यातील माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि आश्रमशाळांमधील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षा, व्यक्तिमत्त्व विकास आणि सामाजिक बांधिलकी याबाबत मार्गदर्शन करत सातत्यपूर्ण परिश्रम, शिस्त आणि गुणवत्तेच्या जोरावर यश संपादन करण्याचा संदेश दिला.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या राज्यस्तरीय शैक्षणिक पुरस्कारांचेही वितरण करण्यात आले. ..........शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल शिक्षण महर्षी राघू सावळेराम जाधव यांना प्रतिष्ठेचा जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच विजय धुंदा कातडे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार, जगन्नाथ एकनाथ जाधव, संजय बाबुराव उकिरडे आणि प्रल्हाद भिवसेन नेहे यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार तर दिव्यांग क्रीडा शिक्षक पुरस्कार कैलास सखाराम कोते यांना तर आरोग्य सेवेतील बिरबल वाकचौरे देऊन सन्मानित करण्यात आले.तर चितळवेढे येथील विद्यालयातील प्रथम विद्यार्थीनी वैष्णवी हरीदास आरोटे.अभिनव शिक्षण संस्थेची विद्यार्थ्यांनी मातोश्री कल्पना हरीभाऊ फापाळे तर सह्याद्री विद्यालयातील ब्राम्हणवाडा विद्यार्थी मातोश्री दिपाली संजय गायकर. सिन्नर येथिल अकोले तालुक्यातील देवठाण येथिल कन्या विजय शेळके पालक यांचा विशेष सन्मान करण्यात आला. अनिल रहाणे व सचिन लगड यांनी प्रभावी सूत्रसंचालन केले, तर अध्यक्षीय सूचना हरिभाऊ फापाळे यांनी मांडल्या, बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास प्रारंभ झाला तसेच सर्व शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिक, सर्टिफिकेट व शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले, कार्यक्रमाच्या शेवटी अशोकराव उगले यांनी उपस्थितांचे आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईच्या सर्व पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य आणि स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. अकोले तालुक्यातील विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा गौरव आणि शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा सन्मान या दुहेरी उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा सोहळा अकोले तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रासाठी प्रेरणादायी ठरला.

# बोगस लग्न लावून देणाऱ्या टोळीचा अहिल्यानगरात शिरकाव; नवरदेवाची तबल ४ लाखांची फसवणूक!

## संभाजीनगर-जालना येथील टोळीवर आरोप; दोन दिवस संसार करून नवरी माहेरी परतली, शेवगाव पोलिसांत तक्रार! अकोल्यातील काही महाठकांचा संशय....

डॉ. विश्वासराव आरोटे
कळसुबाई शिखरावरून

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यात बोगस विवाह लावून आर्थिक फसवणूक करणाऱ्या टोळीचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील काही व्यक्तींनी संगनमताने खोटे लग्न लावून देत शेवगाव तालुक्यातील एका नवरदेवाकडून तब्बल ४ लाख रुपये उकळल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे विवाहानंतर अवघ्या दोन दिवसांनी नवरी माहेरी निघून गेल्याने हा संपूर्ण प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी नवरदेवाने शेवगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. अकोले तालुक्यातील मोठ्या प्रमाणात अनेक जण आपल्या मुलांच्या लग्नासाठी वैतागले असून याचा गैरफायदा घेऊन अकोले शहरात व ग्रामीण भागात कार्यालय थाटले आहेत वधू वर सूचक केंद्र या केंद्रामध्ये नेमके चालते काय या केंद्रामध्ये नेमकी लोकांना लुटण्याचे काम सुरू आहे गोरगरीब आई-वडील मुलाच्या लग्नासाठी जमीन विकतात व मुली आपल्या घरी यावी यासाठी संतापलेले आई-वडील या बोगस एजंटांच्या नादी लागतात या एजंटांचा मोहरक्या अकोल्यातीलच असून या मोहरक्या मुसक्या आवळणे ही काळाची गरज आहे... या वधू वर सूचक केंद्र मध्ये अनेक गलत व्यवसाय चालतात नोंदणी फी त्यानंतर जसे कोर्टात गेल्यानंतर एखाद्या माणसाला न्याय पाहिजे असतो त्यासाठी तो महिन्याला चकरा मारतो त्याप्रमाणे हे एजंट तीच पुनरावृत्ती करून या ठिकाणी या लोकांना जाळ्यात अडकवतात यामध्ये महिलांचा देखील मोठा सहभाग आहे या महिला देखील आमच्याकडे मुली असून या मुलींना काही रक्कम देऊन लग्न लावून या मुली दोन-तीन दिवसात पोहरा करतात मात्र आपली प्रतिष्ठा जपण्यासाठी अनेकांनी ही गोष्ट लपून ठेवली या प्रकरणाकडे श्रीरामपूर पोलीस उपाधीक्षक सोमनाथ वाकचौरे हे लक्ष घालणार असून या मोर्च्याचा बंदोबस्त करणे ही काळाची गरज आहे हा मोरक्या करतो काय हा मोरक्या दिवसभर असे गिऱ्हाईक शोधण्यासाठी अनेक हॉटेल व महत्त्वाच्या ठिकाणी आपण अनेक विवाह जमवले अनेक पेठ सुरगाणा पालघर संभाजीनगर विदर्भ या भागात मुली आणतात अनेक ठिकाणी तर कल्याण डान्सबार येथील अनेक मुलींना फक्त तुम्ही दहा दिवस हो म्हणा तुमचे ओके आमचे ओके म्हणून अनेकांची फसवणूक झाली आणि त्यांनी तर सोने पैसे घेऊन अंटी बरोबर कार्यक्रम करते या आंटीचा देखील आंटीचा बिमोड करणे ही काळाची गरज आहे सध्या हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात बिगर भांडवली विशेष म्हणजे लग्न जमवल्याचा बहाना दाखवून वधूपित्याकडून कपडे चैनीच्या वस्तू या पलीकडे जाऊन अनेक गोष्टी करतात आता तरी खरात बाबा गडगेबाबा यानंतर या बनावट टोळीतील बंदोबस्त होणे ही काळाची गरज आहे

तक्रारीनुसार, शेवगाव तालुक्यातील बालमटाकळी येथील ज्ञानेश्वर महादेव कडूळे हे कामानिमित्त नेवासा परिसरात गेले असता त्यांची वैजापूर तालुक्यातील जातेगाव येथील ज्ञानदेव मिरगे यांच्याशी ओळख झाली. मिरगे यांनी आपण अनेक विवाह जुळवून दिले असून त्यांच्याकडे चांगल्या मुली असल्याचे सांगून ज्ञानेश्वर कडूळे यांना विश्वासात घेतले.

त्यानंतर त्यांनी जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील नळणी बुद्रुक येथील कविता दामू बर्डे हिचे स्थळ दाखवले. मुलीला आई-वडील नसून तिचा सांभाळ मावशीने केला असल्याचे सांगण्यात आले. यासाठी मुलीची मावशी ज्योती राजू गायकवाड, मानलेली आजी सुमनबाई साबळे तसेच ज्ञानदेव मिरगे यांनी मध्यस्थी करत लग्न निश्चित केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या विवाहासाठी विविध कारणे सांगून नवरदेवाकडून ४ लाख रुपये रोख घेण्यात आल्याचा आरोप आहे. त्यानंतर शेवगाव तालुक्यातील आंतरवाली येथे विवाह सोहळा पार पडला. मात्र विवाहानंतर अवघ्या दोन दिवसांनी नवरी कोणालाही न सांगता माहेरी निघून गेली. त्यानंतर तिच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता समाधानकारक प्रतिसाद मिळाला नाही. तेव्हा आपली फसवणूक झाल्याची जाणीव कडूळे यांना झाली.



यानंतर ज्ञानेश्वर महादेव कडूळे यांनी शेवगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. संबंधित सर्वांनी संगनमत करून खोटा विवाह लावून आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी पोलिसांकडे केली आहे.

दरम्यान, अशा प्रकारच्या बोगस विवाहांच्या माध्यमातून आर्थिक फसवणुकीच्या घटना राज्यातील विविध भागांत समोर येत असून आता या टोळीने अहिल्यानगर जिल्ह्यातही शिरकाव केल्याची चर्चा आहे. त्यामुळे विवाह जुळवताना संबंधितांची संपूर्ण माहिती, ओळखपत्रे, कौटुंबिक पार्श्वभूमी आणि कागदपत्रांची खातरजमा करूनच व्यवहार करावेत, असे आवाहन जाणकारांकडून करण्यात येत आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास शेवगाव पोलीस करत असून तपासानंतरच संपूर्ण प्रकाराचे वास्तव स्पष्ट होणार आहे.

# श्री देविदास सोनटक्के यांची जिल्हा उपाध्यक्षपदी निवड; विद्यालयात अभिनंदनाचा वर्षाव



पाथर्डी/राजेंद्र चव्हाण (समर्थ गांवकरी)

निसर्ग आणि सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ, महाराष्ट्र राज्य या मंडळाच्या अहिल्यानगर जिल्हा उपाध्यक्ष पदावर श्री भवानी माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य श्री. देविदास सोनटक्के यांची सन २०२६ ते २०२९ या कालावधीसाठी निवड करण्यात आली आहे.

त्यांच्या या निवडीमुळे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

श्री देविदास सोनटक्के यांनी शिक्षण क्षेत्राबरोबरच पर्यावरण संवर्धन, सामाजिक जनजागृती आणि विविध उपक्रमांमध्ये सातत्याने उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत मंडळाने त्यांच्यावर जिल्हा उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली आहे.

यावेळी श्री शिवाजीराव कराड (गटशिक्षणाधिकारी) पंचायत समिती पाथर्डी, यांनी श्री सोनटक्के यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. त्यांनी आपल्या शुभेच्छापर मनोगतात श्री सोनटक्के यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या पुढील सामाजिक व पर्यावरण विषयक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर विद्यालयाच्या सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व सेवकवृंद यांच्या वतीनेही श्री देविदास सोनटक्के यांचा सत्कार करून मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा व्यक्त करत, त्यांच्या नेतृत्वाखाली पर्यावरण संवर्धन व सामाजिक कार्याला अधिक गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

श्री सोनटक्के यांनी सर्वांचे आभार मानत, मंडळाने दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत पर्यावरण संरक्षण, सामाजिक जनजागृती आणि लोकसहभाग वाढविण्यासाठी सातत्याने कार्यरत राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

## हरविल्याची सूचना



विजय विवेक मुळूक, वय २६ वर्षे, रा. चिंचोली कोकणे, ता. आंबेगाव, जि. पुणे, हे दि. १०/११/२०१७ रोजी घरातून कोणालाही काहीही न सांगता निघून गेले असून अद्यापपर्यंत घरी परत आलेले नाहीत.

त्यांचा सर्वत्र शोध सुरू असून, कोणास त्यांच्या संदर्भात कोणतीही माहिती असल्यास कृपया खालील क्रमांकावर तात्काळ संपर्क साधावा. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल तसेच योग्य ते बक्षीस देण्यात येईल. **संपर्क : ९९६७८०२३९१**

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/४५/२०२६ अकोले दि.०१/०४/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. श्रीकांत सुभाष गोडसे, रा. लहित खु.**, ता. अकोले जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये अर्जदार **यांचा मुलगा अद्वय श्रीकांत गोडसे याचा जन्म दि. २३/०६/२020 रोजी लहित खु.** येथे झाला असल्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालय **लहित खु.**, ता. अकोले यांचे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा संदर्भिय अर्ज मे. तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. श्रीकांत सुभाष गोडसे, रा. लहित खु.**, ता.अकोले जि. अहिल्यानगर **यांचा मुलगा अद्वय श्रीकांत गोडसे याचा जन्म दि. २३/०६/२020 रोजी लहित खु.** येथे झाला आहे. सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **लहित खु.**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. तहसिल कार्यालयासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. तहसिलदार साहेबांसमोर पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. ०१/०४/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

**हुकूमावरुन,**

**कामगिरी क्लर्क**

**तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

# एन.के.टी. ट्रस्टतर्फे दुंगरपाड्यात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य; नानजीभाई ठक्कर यांच्या सेवाभावी कार्याचे कौतुक!

भिवंडी (समर्थ गांवकरी)

**भिवंडी तालुक्यातील दुंगरपाडा येथे कार्यरत नवजीवन लोकविकास संस्थेत शेठ एन.के.टी. ट्रस्टच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या सामाजिक उपक्रमासाठी दानशूर व्यक्ती नानजीभाई ठक्कर यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच संस्थेच्या परिसरात गेल्या १५ वर्षांपासून प्रलंबित असलेली स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध करून देत तिचे उद्घाटनही मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले.**

दुंगरपाडा परिसरात गेल्या १५ वर्षांपासून कचरा वेचणाऱ्या कुटुंबांतील मुलांसाठी नवजीवन लोकविकास संस्था सातत्याने कार्यरत आहे. या परिसरातील पालक दिवसभर कचरा वेचण्यासाठी बाहेर जात असल्याने अनेक लहान मुले शिक्षणापासून वंचित राहत होती. ही परिस्थिती लक्षात घेऊन संस्थेने या मुलांसाठी सात वर्गांमध्ये शिक्षणाची व्यवस्था केली. दिवसभर विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच देखभाल, संस्कार आणि पौष्टिक आहार म्हणून पुरी, डाळ-भात, चणे, भाजी आदींची व्यवस्था केली जाते. संध्याकाळी पालक परतल्यानंतर मुले त्यांच्या स्वाधीन केली जातात.

संस्था गेल्या १५ वर्षांपासून सातत्याने कार्यरत असून, येथे प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी विविध शाळा आणि महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळवून देण्याचे कार्यही संस्था करत आहे. या भागात सुमारे ४०० झोपड्या असून महिला, शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतागृहाची कोणतीही सुविधा नव्हती. ही उणीव ओळखून ईशाकभाई यांनी पुढाकार घेत स्वच्छतागृह उभारून दिले. या नव्या सुविधेचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. त्यामुळे विद्यार्थी, शिक्षक आणि परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.





यावेळी विद्यार्थ्यांना शेठ एन.के.टी. ट्रस्टच्या माध्यमातून वह्या, पुस्तके, पेन तसेच इतर आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाला अखिल भारतीय गुजराती समाजाचे अध्यक्ष संजयभाई पटेल, नानजीभाई ठक्कर, ईशाकभाई, राजेंद्र पांडे, संस्थेचे अध्यक्ष किशोर पाटील, उषा वाघमोडे, सतीश वाघमोडे, सभा शेख, सीमा, सबिना, किरण गायकवाड, बाळासाहेब भोसले, सागर उंडे तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी संजयभाई पटेल यांनी आपल्या मनोगतात नवजीवन लोकविकास संस्थेच्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, येथे प्रत्यक्ष आल्यानंतरच येथील परिस्थिती आणि अडचणींची जाणीव होते. समाजातील दुर्लक्षित आणि वंचित मुलांसाठी संस्था अत्यंत समर्पित भावनेने कार्य करत असून, हे कार्य प्रेरणादायी आहे. तसेच नानजीभाई ठक्कर हे सातत्याने येथे येऊन सामाजिक कार्यात सहभागी होत असल्याबद्दल त्यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले. या प्रसंगी अखिल भारतीय गुजराती समाजातर्फे विद्यार्थ्यांना ५,१०० रुपयांच्या मिठाईचेही वितरण करण्यात आले.


संस्थेच्या पुढील उपक्रमांतर्गत १५ वर्षांवरील मुलींसाठी शिवणकला प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात येणार असून, प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थिनींना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या माध्यमातून मुलींना कौशल्य विकासाची संधी मिळून त्या स्वावलंबी बनाव्यात, हा संस्थेचा प्रमुख उद्देश आहे. शिक्षण, संस्कार, आरोग्य आणि कौशल्य विकासाच्या माध्यमातून समाजातील वंचित मुलांचे जीवन उन्नत करण्यासाठी नवजीवन लोकविकास संस्था आणि शेठ एन.के.टी. ट्रस्ट यांचे सामाजिक कार्य भविष्यातही अशाच सातत्याने सुरू राहणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# नानजीभाई ठक्कर (ठाणावाला) परिवारातर्फे लाखो वारकऱ्यांसाठी ९ जुलै रोजी महाप्रसाद सेवा; आळंदीत बुंदीच्या महाप्रसादाचे वितरण!

आळंदी (समर्थ गांवकरी)

ईश्वराबद्दल असलेल्या मंगल भावनेने आणि लाखो वारकरी भाविकांना महाप्रसाद सेवेचा लाभ व्हावा या पवित्र उद्देशातून धनलक्ष्मीबेन नानजीभाई ठक्कर (ठाणावाला) परिवारातर्फे यंदाही आषाढी वारीनिमित्त महाप्रसाद सेवेचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरुवार, दि. ९ जुलै २०२६ रोजी पहाटे ३.३० वाजता आळंदी येथून श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा पंढरपूरकडे प्रस्थान करणार असून, त्या निमित्ताने आळंदी नगरपालिकेसमोरील एन. के. टी. कार्यालयासमोर पहाटे ३.३० ते दुपारी १२.०० या वेळेत लाखो वारकरी भाविकांना बुंदीच्या महाप्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही अत्यंत शिस्तबद्ध नियोजन करून टेबलांच्या





माध्यमातून वारकरी भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार असून, भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी स्वयंसेवकांची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पायी निघालेल्या वारकऱ्यांची सेवा करण्याचे भाग्य लाभणे ही अत्यंत आनंदाची आणि पुण्याची बाब असल्याची भावना नानजीभाई ठक्कर (ठाणावाला) परिवाराने व्यक्त केली आहे. या महाप्रसाद वाटप कार्यक्रमास शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला), नगरसेवक मनोहर दिवाणे, आळंदीचे नगराध्यक्ष प्रशांत पोपट कुर्डे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, नवनाथ जाधव, ह.भ.प.चंद्रकांत महाराज डुंबरे, सौ. सुवर्णा ठाकरे, डॉ. विठ्ठल वरुडे पाटील (मायमाऊली सेंटर), कांतीभाई बोरुडे (राजगुरूनगर), संजय फुलसुंदर, प्रेम तिवारी, राजेंद्र पांडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार असून, स्वयंसेवकांच्या सहकार्याने हा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात संपन्न होणार आहे. वारकरी संप्रदायातील सेवा, समर्पण आणि भक्तीचा वारसा जपत नानजीभाई ठक्कर (ठाणावाला) परिवाराने अनेक वर्षांपासून सुरू ठेवलेली ही महाप्रसाद सेवा आषाढी वारीतील एक महत्त्वपूर्ण सेवाउपक्रम म्हणून ओळखली जाते.


## निविदा सूचना नोटीस क्र. १/२०२६ - २७

**पंचायत समिती जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे**

मा. गटविकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती जुन्नर सन २०२६-२०२७ करिता खाली नमूद केलेल्या कामांची सिलबंद निविदा सार्वजनिक बांधकाम / जिल्हा परिषद पुणे यांचेकडील नोंदणीकृत ठेकेदाराकडून बंद लिफाफा पद्धतीने मागवित आहोत. कोरी निविदांचा नमुना पंचायत समिती जुन्नर, ता. जुन्नर, जि.पुणे या कार्यालयात सुट्टीचे दिवस वगळून दिनांक ०८/०७/२०२६ ते दिनांक १४/०७/२०२६ या कालावधीमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ या वेळेत विक्रिस उपलब्ध होतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | अंदाज पत्रकिय रक्कम | अनामत रक्कम | कोरी निविदा रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी | नोंदणीकृत कंत्राट दाराचा वर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे.वारूळवाडी वळणवाडी वडारवस्ती (५६) सोलर हायमास्ट बसविणे. ता.जुन्नर | १) महाराष्ट्र शासन, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन निर्णय क्रमांक. तांसुयो - २०२६/ प्र.क्र. १६(२) २(ई-१४००२३५) / योजना -५ दिनांक २७ मार्च २०२६ | १०,००,००० /- | १०,००० /- | ५९० /- | ३ महिने | पुणे जिल्हा परिषद पुणे नोंदणीकृत सर्वसाधारण (खुला वर्गातील १ ते ५ (अ) | |
| २ | मौजे.साकोरी त.बेल्हे चौरेवस्ती मंगरेळ रोड (८८) सोलर हायमास्ट बसविणे.ता.जुन्नर | | १०,००,००० /- | १०,००० /- | ५९० /- | ३ महिने | | |
| ३ | मौजे.वारूळवाडी इंदिरानगर (१३२) सोलर हायमास्ट बसविणे.ता.जुन्नर | | १०,००,००० /- | १०,००० /- | ५९० /- | ३ महिने | | |
| ४ | मौजे.बांगरवडी रामोशीवस्ती (११७) सोलर हायमास्ट बसविणे.ता.जुन्नर | | १०,००,००० /- | १०,००० /- | ५९० /- | ३ महिने | | |
| ५ | मौजे.आर्वी वडारवस्ती (७३) सोलर हायमास्ट बसविणे.ता.जुन्नर | | १०,००,००० /- | १०,००० /- | ५९० /- | ३ महिने | | |

**टिप :-** १) ठेकेदाराने कोरी निविदा मागणी अर्जासोबत नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. २) बंद लिफाफा पोस्टाने किंवा समक्ष दिनांक -१४/०७/२०२६ रोजी कार्यालयीन वेळेत पोहोचणे आवश्यक आहे. ३) सदर कामाबाबत निविदा अटी व शर्ती इ. बाबतचा तपशिल निविदा संचात नमूद असून त्या अटी व शर्तीस अधिन राहून निविदाधारक / ठेकेदारास लागू राहतील याची नोंद घ्यावी. ४) विहित मुदती नंतर बंद लिफाफा (दरपत्रके) स्विकारली जाणार नाहीत. ५) प्राप्त निविदा / दरपत्रके दिनांक -१५/०७/२०२६ रोजी सकाळी ११-०० वाजता सर्वांसमक्ष उघडली जातील याची नोंद घ्यावी. ६) दरपत्रकांबाबत काही हरकत असल्यास त्याच ठिकाणी समक्ष घेणेत यावी. ७) दरपत्रक / निविदा स्विकृतीनंतर तक्रार / हरकत विचारात घेतली जाणार नाही. ८) सदर कामाची अनामत, दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे त्या मंजूर अगर नामंजूर करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत. ९) वरील अटी व शर्तीस अधिन राहून दरपत्रके सादर करावीत.

**उप अभियंता**
**जि.प.बांधकाम उपविभाग जुन्नर**

**गट विकास अधिकारी (उ.श्रे.)**
**पंचायत समिती जुन्नर**



